
साहित्य प्रतिष्ठान
ओथंब
मंजिरी सदाशिव सुशीला दाभोळकर

# प्रस्तावना...............

मंजिरीच्या पावसाच्या कविता म्हणजे मनातल्या ओल्या आठवणींना ताजं करणाऱ्या कविता आहेत. आपल्या मनात पावसाविषयी अनेक रुपं असतात, पावसाविषयी अनेक भावना असतात. त्या कागदावर उतरताना नकळत कवितेचं फॉर्म घेऊन येतात अन पावसाला एक लय प्राप्त होते, मंजिरीची कविता अशीच काहीशी आहे. तीने पावसाशी अन कवितेशी एक प्रामाणिकपणा मनापासुन जपल्याचे जाणवते. कुठेही उगाचच अवघड शब्दांचा बाऊ नाही, अगदी साध्या पण भावूक शब्दात मंजिरी पाऊस अलगद उलगडते.



...............प्रियांका डहाळे

# मनोगत ..............

नमस्कार रसिकहो,

मी मंजिरी सदाशिव सुशीला दाभोळकर. असंच नाव लिहितात ना? हल्ली शाळा-महाविद्यालयात, कोणत्याही दाखल्यावर असंच नाव असतं ना. या नावातुन माझे आई-पप्पा माझ्या सोबत आहेत।

मी प्रथमच नेटद्धारे माझ्या कविता घेऊन येतेय, या कविता मला पावसाइतक्याच प्रिय पण तरीही त्या आपल्यासारख्या सुज्ञ रसिकांना आवडणं तितकंच महत्वाचं ना!

पाऊस माझा अतिशय ‘प्रिय’ ऋ तु. तो मला नेहमीच एक अनवट धुन वाटत आलाय. माझा पाऊस कधी स्वतःमधे मश्गुल असतो तर कधी कोणाचं दुःख पाहून पाझरतो. माझा पाऊस मला डोंगरदऱ्यात, रानावनात, समुद्र-नदी किनारी, कॉक्रीटच्या जंगलातील गर्दीत घेऊन जातो. ट्रेकींगला गेल्यावर जंगलातील रानपाऊस अंगावरुन ओथंबताना सर्वांगाला रानातील झाडपालांचा गंध देऊन जातो. समुद्र किनाऱ्यावरील भन्नाट वाऱ्यासोबत पाऊस लागटपणा करुन भिजवून चिंबाट करुन टाकतो. रिमझिमत्या पावसात माझी छत्रीच पावसात भिजायला नाखुश असते मग काय मला भिजायला मिळतं.

अर्थात जोपर्यंत पाऊस आपल्याला सुरक्षित वाटतो तोपर्यंतच तो आपल्याला आवडतो, पण जर का तो रागावला अन सर्व चराचराला झोडपत सुटला कि मग त्याचं काही खरं नसतं, तो विध्वंस करत सुटतो, त्याला साथ असते तुफान वादळ-वाऱ्याची. अशावेळी वाईट वाटतं की माझ्या ‘प्रिय’ला सगळे वाईट बोलतात, पण तोही तसाच वागतो ना मग त्याची बाजुही घेता येत नाही. पाऊस असा वेस सोडून वागला तरी हे विसरता येत नाही की त्याच्याचमुळे आपलं जीवन आहे अन तो आहे म्हणुनच आपण आहोत. गणपती बाप्पाच्या मागोमाग तोही जायला निघतो त्यावेळी तो पुढच्यावर्षी परत येण्यासाठीच जातो अन आपणही नविन वर्षात जुनमधे येणाऱ्या पाऊसराजाची वाट पाहतो.

तर रसिकहो, आपल्याला मनापासुन धन्यवाद, अन ई-साहित्य प्रतिष्ठानच्या संपुर्ण टिमला, विशेषतः भारती सरमळकर आणि सुनिल सामंत यांना. या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिणाऱ्या माझ्या मैत्रिणीला, त्याचप्रमाणे त्या माझ्या मित्र-मैत्रिंणींना ज्यांनी माझी कविता कागदावर उतरल्यावर लगेच ऐकली, वाचली. तसेच ज्या माझ्या मित्रांनी कवितेसाठी त्यांनी काढलेले त्यांच्याकडचे फॉटॉ देऊ केले, आणखी त्या अज्ञात मित्र-मैत्रिंणींचेही आभार ज्यांनी नॅटवर अपलोड केलेले फोटो मी या पुस्तकासाठी वापरले.

**मंजिरी सदाशिव सुशीला दाभोळकर**

(मुंबई)

manjee15@yahoo.com

manjee15@gmail.com

# एकदा तरी या पावसात भेटायला हवं होतं ......
## माझ्या ग्रुपसाठी



दुर नाही पण जवळच कुठे जायला हवं होतं
एकदा तरी या पावसात भेटायला हवं होत ।

सर्वांच्याच मनात असतं भेटायचं
पण वेळ प्रत्येकाची सारखी नसते
वेळ काढून मित्रांसाठी यायला हवं होतं
एकदा तरी या पावसात भेटायला हवं होत ।

पाऊस जाईल त्याच्या घरी काही दिवसात
पुन्हा मग त्याची-आपली भेट पुढच्या वर्षात
तो आहे तोपर्यंत त्याच्यासोबत न्हायला हवं होतं
एकदा तरी या पावसात भेटायला हवं होत ।

थांबेल कदाचीत आपल्यासाठी पाऊस सुद्धा
जर भेटू आपण सर्व त्याला पुन्हा एकदा
त्यानंही आपल्यासाठी तेव्हा बरसायला हवं
एकदा तरी या पावसात भेटायला हवं होत ।

# पावसाच्या तऱ्हा किती?

पावसाच्या तऱ्हा किती?
आषाढ़ातील धसमुसळा
तर श्रावणातील मंद बावळा ।

भिरंभिरं वाऱ्यासोबत तुफान
तर कधी रिमझिमती तान ।

मल्हार कधी, तर कधी मारवा
शांत एकांती ऐकताना गारवा ।

कधी आठवणींची टपटपती धार
तीच्यासोबत वाहून गेलेलं सार ।

बरसणारा तर कधी तरसणारा
मन मानेल तसा कोसळणारा ।

एका छत्रीतला, कधी एकट्याच्या छत्रीतला
तोच असा एक दोघांच्यांही समजत्या वेळेतला ।

कधी प्रितीचा तर कधी भेटीचा
पाऊस ओल्या ओल्या मिठीचा ।




पहिला पाऊस
पहिल्या पावसाची पहिली गळाभेट
ओठांची कुजबुज सांगतात ओठ ।
पहिला पाऊस, आले तुझिया घरी
स्वागताला खिडकीमधे दिसे डोंगरगिरी ।
पहिला पाऊस, काही देण्याघेण्याचा
नेमकाच दिवस माझ्या प्रेमाविष्काराचा ।
पहिल्या पावसाच्या दाटतात आठवणी
आपोआप होते मग डोळयांतुन पाठवणी ।
डोळयांतील पाऊस, भेटतो पावसाला
गळाभेट त्यांची नकळे मग कोणाला ।
पहिला पाऊस, पहिलाच ठरला
परत फिरूनी नाही कधी आला ।

# हा पाऊस मस्त मस्त

हा पाऊस वेडावलेला
आहे तुझाच संग संग
हातात हात दिठीत
मन आहे दंग दंग ।

हा पाऊस मस्तावलेला
तन झालं चिंब चिंब
ओल्या तुझ्या मिठीत
मन आहे धुंद धुंद ।

हा पाऊस बेभानलेला
सावर, थांब थांब
श्वासांच्या या लयीत
मन आहे थेंब थेंब ।



# पाऊस थेंबांचा

पाऊस थेंबांचा
तुझ्या-माझ्या प्रेमाचा ।

पाऊस झाडांचा
येणाऱ्या नव्या पालवीचा ।

पाऊस आठवणींचा
आपल्या नसलेल्या भेटींचा ।

पाऊस नदी-ओढ्यांचा
अवखळत धावणाऱ्या पाण्याचा ।

पाऊस विरहाचा
न होणाऱ्या मिलनाचा ।

पाऊस पाना-फुलांचा
रानातल्या गर्द ताटव्यांचा ।

पाऊस तुझा-माझा सर्वांचा
सृष्टीतील चराचराच्या सहजीवनाचा ।

# अजुनही आभाळ भरलेलंच आहे



अजुनही आभाळ भरलेलंच आहे
गडगडाटासह मुसळधार कोसळूनही
राग-लोभ, खेद-खंत, खरं-खोट यांनी
अजुनही आभाळ भरलेलंच आहे ।

राग तुझा माझ्यावर आहे
तुझ्या भेटीची आस मलाही
मी भेटणार नाही, याचसाठी
राग तुझा माझ्यावर आहे ।

मी तुझी अभिसारीका आहे
तरीही मी तुझी परीणिता
टाकलेस जरी तु मला तरी
मी तुझी अभिसारीका आहे ।

तुझ्यात माझे सुख आहे
हास तु अन बोल तु
दुर तु, नाही समोर तरी
तुझ्यात माझे सुख आहे ।



# आज पहिला पहिला पाऊस आला

आज पहिला पहिला पाऊस आला
आठवण तुझी, सोबत घेऊन आला ।

आठवणींच्या सोबत आलं तुझं घर
घराच्या खिडकीतुन दिसणारा डोंगर ।

असेल आता तो उजाड गवती पिवळाशार
थेंबो-थेंबी पावसाने होईल हिरवागार ।

हिरवागार डोंगर अन दुरवर दिसते खाडी
खाडीच्या धुक्यात तरंगणारी होडी ।

डोंगरातुन वाहतील छोटे छोटे झरे
खिडकीतुन दिसणारे हे द्रुष्य खरे ।

ऑढ या सर्वांची, पुन्हा पुन्हा पाहण्याची
शक्यता नाही, कधीच मी घरी येण्याची ।

# पाऊस सुरू झालाय गं

पाऊस सुरू झालाय गं
पायवाटा बोलावतायतं ।

रान जागं झालयं गं
रानफुलं फुलतायतं ।

पाऊस झिम्माड झालाय गं
नदी-झरे वाहतायतं ।

धुकं दाट दाटलंय गं
रस्ता त्यात हरवलायं ।



# तुझ्या भेटीला

तुझ्या भेटीला
सोबतीला
पाऊस आला ।

पाऊस आला
सोबतीला
घेऊन आला
सुसाट वारा ।

सुसाट वारा
संगतीला
घेऊन आला
गार गारवा ।

गार गारवा
साथीला
घेऊन आला
चिंब शहारा ।

चिंब शहारा
मदतीला
घेऊन आला
तुझा उबारा ।

# पाऊस पाऊस

पाऊस पाऊस
माझ्या मनात भरला
जसा तुझा सहवास
फक्त स्वप्नात उरला ।

आठवणी तुझ्या
थेंब पावसाचे जसे
चिंब नाहताना त्यात
होते लोकांत हसे ।

पावसाच्या गारव्यात
तरारले नवे बीज
उमजले नाही तुला
माझ्या मनाचे रे गुज ।

निमित्त फक्त पावसाचे
सारा मनाचाच खेळ
आता फिरून नाही कधी
तुझा माझा मेळ ।





# या पावसात तु

या पावसात तु गारांसारखा
वर्षत ये आषाढाच्या मेघांतुन
बेभान होऊन वावटळीसारखा
जा घेऊन वाऱ्याच्या पोकळीतुन ।

जेथे असेल आपलाच कारवा
पिंजलेलं धुकं, गंधलेली हिरवळ
शिरशिरणारा गारवा
अन सोबतीचा दरवळ ।

चिंबलेल्या आसमंतात
भिजली संगे दरी-खोरी
पायवाटेच्या वळणात
वाहती झुळूझुळू बाळझरी ।

चित्र हे पावसाचं पाहिलेलं
साठवणीतल्या आठवणीचं
तुझ्यासोबत कल्पलेलं
अन पाहिलेल्या स्वप्नाचं ।

# पानी आलंया आलंया

पानी आलंया आलंया आभायातुन
देव देतोया देतोया राग ठिऊन ।

चुल थंड झालीया, लाकडं वली समदी
माझ्या पोरास्नी खाणं नाही घरामंदी ।

या पान्यानं वाह्यलं शेत माझं
सावकारा देऊ कसं द्याजं तुझं ।

फास हा आलाया गळ्याशी रं
सांग मी जाऊ कुठं देवा तु रं ।





# थेंब

थेंब पावसाचे
भिजवण्यासाठी आसुसलेले
वाऱ्याच्या सोबतीने
गारा घेऊन आलेले ।

लाडावलेले असताना
हिरवं सोनं देत प्रेमात बरसलेले
रागावलेले असताना
प्रलय होत लुट करत कोसळलेले ।

थेंब अश्रुंचे
येणाऱ्या आठवणींचे
दुरावलेल्या क्षणांचे
होणाऱ्या त्रासाचे ।

कधी पापण्यांत दडपलेले
कधी गालावर ओघळलेले
कधी एकांतात ढाळलेले
कधी सहज मोकळे झालेले ।

खारटलेले समुद्रासारखे
दुःखामधे आटलेले
गोडावलेले साखरेसारखे
सुखामधे उधाणलेले ।

# झाड

माझ्या घराच्या खिडकीतुन दिसणारं झाड
उन्हाळयाचं ऊन अंगावर घेत
हिवाळयाच्या थंडीत कुडकुडत
ऊन-थंडीबरोबर धुळीत माखत
पावसाळा आला की
सचैल स्नान करतं
शॉवर बाथ घेत
पानापानांच्या अंगोपांगावर
पावसाचे तुषार झेलीत
न्हाऊन टवटवीत झाल्यावर
फांद्यांचे हात हलवीत
हाय-हॅलो करीत राहतं ।



# आभाळ – १

आभाळ ओथंबून आलयं
बाहेरचं अन आतलंही
पाऊस बाहेरचं आभाळ रितं करुन जाईल
पण
आतलं आभाळ भरलेलंच राहील
आतला पाऊस मन रितं करुन जाणार नाही
तो कोसळतचं राहील आसवांचे पुर आणीत ।

# आभाळ – २

आभाळ त्यादिवशी खुपखुप रडलं
स्वतः रडताना त्याने इतरांनाही रडवलं
त्यांच्या सांत्वनाला खुप होते
आभाळाच्या सांत्वनाला कोणी नव्हतं
मनात आलं आभाळाकडे जावं
त्याला शांत करावं
त्याच्या वेदनेवर हळूवार फुंकर घालावी
कसं शक्य आहे हे
अशक्यच
त्याच्या-माझ्यातलं न मिटणार अंतर
कधीकधी असंच होतं
कुणी आपलं वाटलं तरी
त्याच्याकडे जाणं शक्य नसतं
कारण
त्याच्यात अन आपल्यात
आभाळाइतकं अंतर असतं ।

# परतीचा पाऊस

अगं ! मी निघालो परत आता
म्हंटलं, भेटतो तुला जाता जाता ।

माझ्या सोबतीनं मनसोक्त भिजलीस
गाठीभेटी झाल्यावर टवटवीत दिसलीस ।

तुझ्यासोबत त्यानंही माझ्यात चिंब भिजावं
मलाही वाटलं होतं हे स्वप्न सत्यात यावं ।

पण त्याला मी आवडत नाही तितकाचं
अन तुझा मी आवडता त्याच्या इतकाचं ।

येईन मी, भेटेन मी, पुढच्या वर्षी परत
तेव्हा नक्कीच असु आपण तिघे मजा करत ।

तसा मी तुझ्यासोबत नेहमीच असतो
सय त्याची घेऊन तुझ्या डोळयांमधे येतो ।

तरी मला पुन्हा पुन्हा बोलाऊ नकोस
मी यावं म्हाणुन त्याची सय काढू नकोस ।

निरोप दे मला, आता मात्र मी थांबत नाही
येतो येतो म्हणताना पाय काही निघत नाही ।




प्रकाशक आणि वितरक




**www.esahity.com**

ई साहित्य प्रतिष्ठान आपल्यासाठी नवनवीन ई बुक्स सातत्याने प्रकाशित करत असते. आमच्या विनामूल्य ई बुक्स साठी ताबडतोब नोंदणी करा. esahity@gmail.com ला फ़क्त एक शब्दाची मेल करा. “नोंदणी करा” अशी. बस्स. आणि यावर्षातली ई पुस्तकांची सिरीज आपल्या मेल इन बॉक्स मध्ये धडाधड येऊन पडेल बघा! पहिला येईल त्याला पहिलं पुस्तक. या शिवाय आमची नेटाक्षरी वगैरे नियतकालिकं असतातच. दर आठवड्याला आमची नवनवीन विषयाला वाहिलेली ई साप्ताहिकं येतीलच. तीही पूर्णतः विनामूल्य. मराठी भाषेत एक वादळी झंझावाताने प्रवेश केला आहे. ’काव्यांजली’ , ’मराठी कविता आदी चाळिसहजारहून अधिक सभासद संख्या असलेल्या कम्म्युनिटीजच्या सदस्यांनी चालवलेलं हे जबरदस्त व्यासपीठ आपल्याला प्रेमाचं आमंत्रण देतं आहे. हे पुस्तक कसं वाटलं हे आम्हाला esahity@gmail.com या पत्त्यावर कळवा. या पुढली आणि आधीची दर्जेदार प्रकाशनं आपल्याला विनामुल्य मिळण्यासाठी याच esahity@gmail.com वर रजिस्टर करू शकता. ई साहित्य प्रतिष्ठानची साप्ताहिक नेटाक्षरी, स्वरनेटाक्षरी, काव्यांजली दिवाळी अंक आदी प्रकाशनं सातत्याने सुरूच असतात. सुमारे ५०००० लोकांपर्यंत पोहोचणारी ही प्रकाशनं आहेत. लवकरच ही वाचक संख्या १ लाखावर नेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आणि त्याने आमचं समाधान नाही. प्रत्येक मराठी ई मेल धारक, इंटरनेटला जोडलेला प्रत्येक मराठी माणूस आमच्या या चळवळीत जोडला जावा हा आमचा ध्यास आहे.

मराठी साहित्य नव्या ई युगात सर्वोच्च स्थानावर जावं, मराठीच्या अभिव्यक्तीची ताकद जगभर पसरलेल्या नव्या पिढीला जाणवावी हा आमचा उद्देश आहे. नवीन मराठी साहित्यिकांना व्यक्त होण्यासाठी एक नवीन व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपण या नवीन ई साहित्य यज्ञात सामिल व्हावं असा आमचा आग्रह असतो. ई बुक्स हे साहित्याचं भविष्य आहे. इंग्रजीत पाच लाखाहून अधिक ई बुक्स आहेत. तर मराठीत शंभराच्या आत बाहेर. हे चित्र बदलायचंय. यासाठी आपण आमच्याशी संपर्क साधावा. कळावे लोभ असावा.


आपला मित्र

**नाम गुम जायेगा - 9869674820**

समन्वयक - ई- साहित्य प्रकाशन

**esahity@gmail.com**


ई-साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामूल्य ई-साप्ताहिके

ई-स्टाप, स्वरनेटाक्षरी ऑडियो अल्बम, बालनेटाक्षरी

प्रसिद्ध झालेली ई-बुक्स

टल्लीची शाळा, मकरंदच्या त्रिवेण्या, ग्रेव्हयार्ड लिटरेचर, चार क्षण,
तॉ आणि ती, प्रियेचे अभंग, देशी दारुचे दुकान-3D, ई-शाळा,
तो, मी आणि सिगरेट, लोकल गॉष्टी, मोरया, मीरा (अनुवाद)


मुखपृष्ठ डिझाईन, मांडणी व सजावट

भारती सरमळकर - Last Bench Designs (where creativity begins)

bharatisarmalkar@gmail.com


